सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ६७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ - ६

## वक्फ दुरुस्ती विधेयक संसदेत सादर; सरकारने मुस्लिमांना दिली पाच आश्वासने

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२नवी दिल्ली**

केंद्र सरकारने वक्फ दुरुस्ती विधेयक २०२५ बुधवारी(२ एप्रिल २०२५) लोकसभेत मांडले. प्रश्नोत्तराच्या तासानंतर दुपारी संसदीय कामकाज आणि अल्पसंख्यांक मंत्री किरेन रिजिजू यांनी हे विधेयक सभागृहात चर्चेसाठी मांडले. या विधेयकावर चर्चेसाठी ८ तासांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. संसदेत विधेयक मांडत असताना विरोधकांकडून प्रचंड गदारोळ झाला. विरोधकांनी चर्चेची वेळ वाढवून १२ तास करण्याची मागणीही केली आहे. दरम्यान, हे विधेयक मांडताना सरकारने देशातील मुस्लिम समुदायाला ५ आश्वासनेही दिली आहेत.

किरेन रिजिजू म्हणाले की, या विधेयकाबाबत ९७२७७७२ याचिका



आल्या होत्या. आजपर्यंत यापेक्षा जास्त याचिका कोणत्याही विधेयकाबाबत कधीच आलेल्या नाहीत. विविध समित्यांसमोर २८४ शिष्टमंडळांनी आपली मते मांडली. सकारात्मक विचाराने या विधेयकाला विरोध करणारेही याला पाठिंबा देतील, असा आमचा विश्वास आहे.

**सरकारने मुस्लिमांना ही ५ आश्वासने दिली**

१. संसदेत विधेयक सादर करताना किरेन रिजिजू यांनी मुस्लिमांना आश्वासन दिले की, या विधेयकात कोणत्याही मशिदीवर कारवाई करण्याची तरतूद नाही. हा केवळ मालमत्तेचा मुद्दा आहे, या विधेयकाचा धार्मिक संस्थांशी काहीही संबंध नाही.

२. सरकारने पुढे सांगितले की, वक्फ दुरुस्ती विधेयकात कोणत्याही धार्मिक स्थळ किंवा मशिदीच्या व्यवस्थेमध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करण्याची तरतूद नाही. यामध्ये कोणताही बदल किंवा हस्तक्षेप होणार नाही.

३. वक्फ दुरुस्ती विधेयकात कोणत्याही धार्मिक कार्यात हस्तक्षेप करण्याची तरतूद नाही. आम्ही कोणत्याही मशिदीच्या कामकाजात हस्तक्षेप करणार नाही. वक्फ बोर्ड कायद्याच्या कक्षेत असेल, त्यात कायद्याच्या विरोधात काहीही केले जाणार नाही.

४. जिल्हाधिकाऱ्यांपेक्षा वरचा कोणताही अधिकारी सरकारी जमीन आणि कोणतीही विवादित, जमीन यांच्यातील वादावर लक्ष देईल. वक्फ मालमत्ता निर्माण करताना आम्ही कोणत्याही आदिवासी भागात जाऊ शकत नाही. हा बदल महत्त्वाचा आहे. कोणत्याही मशिदीवर कारवाई करण्याची तरतूद नाही.

५. सरकारने वचन दिले की, केंद्र परिषदेतील एकूण २२ सदस्यांपैकी ४ पेक्षा जास्त गैर-मुस्लिम असू शकत नाहीत. माजी अधिकाऱ्यांसह संसदेचे तीन सदस्य निवडून येणार आहेत. संसद सदस्य कोणत्याही धर्माचे असू शकतात.

## पाकिस्तानी अभिनेता फवाद खानचा 'अबीर-गुलाल' उधळून लावणार, राज ठाकरेंची मनसे आक्रमक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२मुंबई**

८ वर्षांनंतर पाकिस्तानी अभिनेता फवाद खान 'अबीर गुलाल' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पुनरागमन करत आहे. या अभिनेत्याला त्याच्या चित्रपटांसाठी भारतात खूप प्रेम मिळाले आहे. तो बराच काळ हिंदी चित्रपटसृष्टीपासून दूर होता, पण अलीकडेच 'अबीर गुलाल'च्या घोषणेमुळे चाहते त्याला मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी खूप उत्साहित झाले होते. १ एप्रिल रोजी 'अबीर गुलाल' चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाल्यानंतर फवाद खानचे चाहते आनंदात होते, तर त्यावरून वादही सुरू झाला आहे.



राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच महाराष्ट्रात त्यावर बंदी घालण्याची मागणी केली आहे. मनसे सिनेमा शाखेचे अध्यक्ष अमेय खोपकर यांनी माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, ते महाराष्ट्रात हा चित्रपट प्रदर्शित होऊ देणार नाहीत कारण त्यात एक पाकिस्तानी कलाकार काम करत आहे.

वृत्तानुसार, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाल्यानंतर चित्रपटाबद्दल माहिती मिळाली. मनसेने म्हटले आहे की, हा चित्रपट कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात प्रदर्शित होणार नाही. याप्रकरणी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते संजय निरुपम यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणतात, पाकिस्तानी कलाकारांना भारतात काम करण्याची परवानगी द्यायची की नाही हा निर्णय सरकारने घेतला पाहिजे.

## मोदीजी तुम्ही संघर्ष करा, आम्ही तुमच्यासोबत आहोत

### वक्फ दुरुस्ती विधेयकाच्या समर्थनार्थ मुस्लिम महिला बाहेर पडल्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२भोपाळ**

गेल्या काही दिवसापासून वक्फ विधेयकाची देशभर चर्चा सुरू आहे. हे विधेयक आज लोकसभेत मोदी सरकारने सादर केले आहे. काही जण या विधेयकाच्या बाजूने आहेत तर काही विरोधात आहेत. सरकारला सभागृहात जेडीयू, टीडीपी आणि जेडीएस या पक्षांचा पाठिंबा मिळाला आहे. विरोधी पक्षही या विधेयकाविरुद्ध एकवटला आहे. काँग्रेसने हे विधेयक संविधानाच्या विरोधात असल्याचे म्हटले. समाजवादी पक्षाने या विधेयकाला विरोध केला जाईल असं सांगितले आहे.

भोपाळमध्ये पंतप्रधान मोदींच्या समर्थनार्थ मुस्लिम महिलांनी घोषणाबाजी सुरू केली आहे.भोपाळमध्ये मुस्लिम महिला वक्फ दुरुस्ती विधेयक २०२४ च्या समर्थनार्थ बाहेर पडल्या. भोपाळमध्ये मोठ्या संख्येने निदर्शने करणाऱ्या मुस्लिम महिलांनी पंतप्रधान मोदींना पाठिंबा देणारे फलक हातात घेतले होते.




यामध्ये पंतप्रधान मोदींचे आभार मानले आहेत. महिलांनी 'मोदीजी, तुम्ही लढा, आम्ही तुमच्यासोबत आहोत' अशा घोषणा दिल्या आहेत.

**दिल्लीतही महिला समर्थनात उतरल्या**

दिल्लीतही वक्फ कायद्याच्या समर्थनात महिला रस्त्यावर उतरल्या आहेत. महिलांनी हातात फलक पकडले आहेत, त्यावर 'मोदीजी, वक्फ मालमत्तेचे उत्पन्न तिच्या योग्य मालकापर्यंत पोहोचवल्याबद्दल आणि वक्फ बोर्डात महिला आणि मागासलेल्या मुस्लिमांना वाटा दिल्याबद्दल धन्यवाद', असं लिहिले आहे.तर दुसरीकडे या विधेयकावरुन आम आदमी पक्षाचे राज्यसभा खासदार संजय सिंह यांनी टीका केली आहे. संजय सिंह म्हणाले की, देशातील जनतेला आता हे लक्षात आले पाहिजे की भाजपने वक्फ मालमत्तांवर कब्जा करून त्या आपल्या मित्रांना देण्यास सुरुवात केली आहे. ते गुरुद्वारा, मंदिरे आणि चर्चच्या मालमत्तांबाबतही असेच करतील. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, आम्ही विधेयकावर विचार करू. याबद्दल चर्चा सुरू आहे. आम्ही आय.एन.डी.आय.ए. सोबत आहोत. युती आणि युती पूर्ण ताकदीने राहील.

## राख, वाळूच्या सर्व गँगला सुतासारखं सरळ करणार, अजित पवारांचा बीडमध्ये इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२बीड**

'राख, वाळूसह सर्व गँगला सुतासारखं सरळ करणार', असा इशारा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडमधून दिला. अजित पवार बीड दौऱ्यावर आहेत. यावेळी तरुणांशी संवाद साधताना अजित पवार यांनी बीडमधील वाढती गुन्हेगारीवर मोठं विधान केले आहे. आता सर्व गँगला सुतासारखं सरळ करणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. तसंच त्यांनी बीडकरांना घाबरू नका मी तुमच्यासोबत आहे असं देखील सांगितले.



अजित पवार यांनी गँगला इशारा देत सांगितले की, 'इथे राख, वाळू अशा सगळ्या गँग आहेत. मात्र आता सगळ्या गँग बंद करणार आहे. आता सर्व गँगला सुतासारखे सरळ करणार आहे. तुम्ही घाबरु नका मी आहे. आता विकास कामे करताना रास्ता कागदावर दाखवून पैसे खाईल त्याला मातीत घातल्याशिवाय राहणार नाही.'बीडचे पालकमंत्री झाल्यानंतर अजित पवार दुसऱ्यांदा बीडमध्ये आले आहेत. अजित पवार बीडमध्ये येत नसल्याच्या टीका अनेक जण करत होते. या टीका करणाऱ्यांना देखील त्यांनी उत्तर दिलं आहे. 'अजित पवार एक महिना झाला बीडमध्ये आला नाही असे काही जण म्हणाले. अरे पण मी एक महिना तिथे बसून बजेट करत होतो. सात लाख तीस हजार कोटी हा आकडा मला लिहून दाखववा.'अशा शब्दात त्यांनी विरोधकांना झापलं.अजित पवारांनी युवकांना आवाहन केले आहे की, 'आजही आमचं वय झालं असलं तरी आम्ही नवीन नवीन शिकतो. रोज नवीन शिकता येते. पदाधिकाऱ्यांनी एकमेकांबाबत चांगली भावना ठेवा. याने याचा कार्यक्रम पाडला वगैरे वगैरे असं करू नका. असं कोणी कोणाचा कार्यक्रम पाडत नसतं. युवकांनो निर्व्यसनी रहा.'

'राख, वाळूसह सर्व गँगला सुतासारखं सरळ करणार', असा इशारा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडमधून दिला. अजित पवार बीड दौऱ्यावर आहेत. यावेळी तरुणांशी संवाद साधताना अजित पवार यांनी बीडमधील वाढती गुन्हेगारीवर मोठं विधान केले आहे. आता सर्व गँगला सुतासारखं सरळ करणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. तसंच त्यांनी बीडकरांना घाबरू नका मी तुमच्यासोबत आहे असं देखील सांगितले.

## दिशा सालियन प्रकरणात माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग मास्टरमाईंड?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२मुंबई**

भिनेता सुशांतसिंह राजपूतची मॅनेजर असलेल्या दिशा सालियनच्या मृत्यू प्रकरणात मोठा ट्विस्ट आला आहे. दिशा सालियन यांचे वडील सतीश सालियन यांनी थेट मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करत मुलीच्या मृत्यूमागे सामूहिक बलात्कार आणि खून असल्याचा गंभीर आरोप केलाय. मुलीच्या संशयास्पद मृत्यूच्या प्रकरणात तत्कालीन पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांनी सदर प्रकरणातील तथ्ये लपवल्याचा गंभीर आरोप करत परमबीर सिंग मास्टरमाईंड असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे दिशा सालियन प्रकरणात पोलीस दलातील माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांच्या नावाचा वारंवार उल्लेख होत असल्यामुळे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग मास्टरमाईंड आहेत की नाही याविषयी चर्चा रंगू लागल्या आहेत.



दिशा सालियन प्रकरणात पत्रकार परिषद घेऊन वडील सतीश सालियन आणि वकील नीलेश ओझा यांनी पत्रकार परिषद घेतली. मुलीच्या संशयास्पद मृत्यूच्या प्रकरणात त्यांनी तत्कालीन पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांच्यावर या प्रकरणातील तथ्ये लपवल्याचा गंभीर आरोप केला होता तसेच तेच मास्टरमाईंड असल्याचे सांगितले होते. मंगळवारी दिशा सालियन प्रकणातील वकील निलेश ओझा यांनी पत्रकार परिषद घेऊन पुन्हा एकदा माजी पोलीस अधिकारी परमबीर सिंग यांना सदर प्रकरणातील मास्टरमाईंड असल्याचा आरोप केला आहे.परमबीर यांनी सदर प्रकरणात आदित्य ठाकरे यांचे नाव येताच कव्हरअप केले. पोलिसांनी दिशाभूल केली. खोटे पुरावे मान्य करायला भाग पाडले आणि तपास योग्य दिशेने होऊ दिला नाही. त्यांनी पत्रकार परिषद घेऊन सीसीटीव्ही फुटेजमध्ये घटनास्थळी कोणताही राजकारणी आला नसल्याचा दावा केला होता. परंतु मोबाईल टॉवरच्या लोकेशनपासून प्रत्यक्षदर्शींच्या जबाबापर्यंत सर्वच गोष्टी त्यांचा हा दावा खोटा असल्याचे सिद्ध करत आहेत. निलेश ओझा पुढे म्हणाले की, मुंबईच्या दोन माजी सहाय्यक पोलीस आयुक्तांनी त्यांची भेट घेतली आहे. सदर दोन्ही माजी पोलीस आयुक्तांनी आपल्याला दिशा सालियन प्रकरणाशी संबंधित माहिती असलेला पेनड्राईव्ह दिलाय. भेटी दरम्यान दिशा सालियनचे वडील सतीश सालियनदेखील उपस्थित होते.

## हर्षवर्धन सपकाळांचा महायुती सरकारविरुद्ध 'दांडपट्टा' सुरूच; आता फडणवीसांना म्हणाले 'गजनी'

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२बुलढाणा**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा महायुती सरकारविरोधात टीकेचा 'दांडपट्टा' सुरूच आहे. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करताना, सपकाळ यांना अभिनेता अमिर खान याच्या 'गजनी' पात्राचा आठवण झाली. आणि सपकाळ यांनी देवेंद्र फडणवीस गजनी आहेत का?, असा घणाघात केला.सपकाळ यांनी प्रदेशाध्यक्षपदाचा कारभार स्वीकारल्यापासून महाराष्ट्रात झंझावात सुरू आहे. महाराष्ट्रातला कानाकोपरा पायाखालून घालताना काँग्रेस संघटना, पक्षाची बांधणीवर काम करत आहेत. गेल्या दोन दिवसांपासून ते बुलढाणा इथं दौऱ्यावर आहेत. तिथून त्यांनी महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल चढवला आहे.खडकपूर्णाच्या डाव्या कालव्याहून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासकीय मंजूरी देऊन त्याला वर्क ऑर्डर देखील दिली होती. आता म्हणतात की, पाणी दिलं जाऊ शकत नाही. त्यांचे हे विधान



असेल, तर त्यांनी एकदा तपासून बघावं, तेव्हाचे तत्कालीन आमदार शशिकांत खेडेकर यांच्या वाढदिवसानिमित्ताने फडणवीस यांनी त्यांना हे गिफ्ट दिलं होतं, याची आठवण हर्षवर्धन सपकाळ यांनी करून दिली. याच पार्श्वभूमीवर डावा कालवा मंजूर केला होता. आता चक्क ते दिलेल्या आश्वासनावर आणि साइन केलेल्या फाईलवरून ते घुमजाव करीत असतील, तर त्यांनी त्याचा पुनर्विचार करावा. अथवा त्यांना 'गजनी' म्हटल्याशिवाय आमच्याजवळ दुसरा पर्याय राहणार नाही, असा टोला हर्षवर्धन सपकाळ यांनी लगावला.


## अखेर कुणाल कामराने माफी मागितली पण समन्स बजावलेल्या प्रेक्षकाला दिली खास ऑफर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२मुंबई**

स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा प्रकरणात नवीन घडामोड समोर आली आहे. कुणाल कामराच्या नया भारत या शोला उपस्थित असणाऱ्या प्रेक्षकांनाही समन्स बजावले आहे. त्यामुळे अनेक प्रेक्षकांना पोलिसांनी चौकशीला बोलावले आहे. त्यातून अनेकांना अडचणींना सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे कुणाल कामराने या प्रेक्षकाची माफी मागत थेट एक ऑफर दिली आहे.

**काय आहे कुणाल कामराची ऑफर?**

स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराच्या शोला विविध प्रेक्षक मोठी गर्दी करत असतात. त्यात नुकताच त्याचा शो वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. कारण यामध्ये शिवसेनेच्या बंडावर एकनाथ शिंदेंवर विडंबन करण्यात आले होते. त्यामुळे केवळ कुणाल कामरालाच नाही तर आथा थेट या शोला उपस्थित असणाऱ्या प्रेक्षकांनाही समन्स बजावले आहे. त्यात एक बँकर असलेल्या प्रेक्षकाला मोठी अडचण निर्माण झाली आहे.



कारण त्यांना केरळला फिरायला जायचे असताना हे समन्स बजावण्यात आल्याने टुर रद्द करत मुंबईत परतावे लागले. तर आपल्या प्रेक्षकाला अशा प्रकारे आपल्या शोमुळे अडचणीला सामोरे जावे लागल्याने कुणाल कामराने सर्व प्रेक्षकांची माफी मागितली आहे. तसेच त्याने या बँकर असलेल्या प्रेक्षकाला रद्द झालेल्या टुरवर परत जाण्याची ऑफर दिली आहे.

## संपादकीय ......

# विजेची 'स्वस्ताई'

बरेच दिवसांत काही स्वस्त झाल्याचे ऐकले नव्हते. सोने ७२ हजारवरून थेट ९२ हजार रुपयेपर्यंत जाऊन पोहोचले आणि आपल्यासारख्या सामान्य लोकांनी ते खरेदी करण्याचा विचार सोडून दिला. घरभाडे वाढते, किराणा मालाचे भाव नेहमी वाढत असतात. ज्या ज्या कोणत्या दैनंदिन वापराच्या गोष्टी आहेत, त्या प्रत्येकाचा भाव वाढत असतो. अगदी साध्या दैनंदिन भाज्याही महागच होत असतात. एकंदरीत महागाई हा सामान्य लोकांच्या जिव्हाळ्याचा विषय असतो. श्रीमंत लोकांना स्वस्ताई किंवा महागाईने फरक पडणार नाही, इतक्या प्रचंड प्रमाणात त्यांच्याकडे पैसे असतात. सामान्य लोकांचे महिन्याचे उत्पन्न निश्चित असते आणि त्यामध्ये त्यांना उदरनिर्वाह करायचा असतो. अशी सगळी परिस्थिती असताना महाराष्ट्र राज्यात वीज दर २० टक्क्याने स्वस्त होणार या बातमीने शॉक बसण्याची वेळ आली आहे.अन्न, वस्त्र व निवारा या कधीकाळी मानवाच्या मूलभूत गरजा होत्या. यामध्ये आता वायफाय आणि वीज यांचा समावेश केला पाहिजे. राज्यात कोणताही उद्योग येणार असेल तर तो पहिल्यांदा जमीन शोधतो आणि त्यासोबत त्याला पाणी आणि वीज या गोष्टी लागत असतात. अशी ही जीवाभावाची वीज आपले जगणे बरेचदा कठीण करत असते. ग्रामीण भागामध्ये लोड शेडिंग नावाचा एक प्रकार असतो. दिवसातले सहा, आठ किंवा अगदी १२ तासही लाईट जाते आणि शेताला पाणी देणे यासारखी कामे ठप्प पडतात. शहरांची गोष्ट वेगळी असते. तिथे वीज फारशी जात नाही आणि गेली तर लगेच येते. त्यामुळे त्या विजेचा खर्च बर्यापैकी खुशीने केला जातो.

विजेचे बिल हा एक धडकी भरवणारा उपक्रम आहे. नेमके या महिन्याचे बिल किती येईल हा सस्पेन्स बिल आल्यानंतरच उघड होतो. लहरी विजेसारखे विजेचे बिलही तसेच असते आणि ते कधी १५००, कधी २०००, तर कधी ५००० येते. दिल्ली येथील सरकारने प्रत्येक कुटुंबाला काही एक युनिट वीज मोफत देण्याचा उपक्रम करण्याचा प्रयत्न केला तेव्हापासून वीज बिल कसे कमी करता येईल याविषयी प्रत्येक राज्य प्रयत्न करू लागले. आपल्या राज्याला वीज वीस टक्के स्वस्त करण्यामध्ये यश आले याबद्दल खरे तर शासनाचे अभिनंदनच केले पाहिजे. वीज स्वस्त झाल्यामुळे सर्वसामान्य नागरिक सुखावले आहेत. याचे कारण म्हणजे गेल्या कितीतरी वर्षांत कोणतीच गोष्ट स्वस्त झाली नव्हती. त्यात विजेसारखी गोष्ट स्वस्त होणे ही आनंददायक बाब आहे, यात काही शंका नाही. वीज स्वस्त करण्यासोबतच ती नियमित आणि पूर्णवेळ कशी मिळेल यासाठी संबंधित मंडळांनी प्रयत्न केले पाहिजेत. रात्री-बेरात्री लाईट येते म्हणून शेतकरी मंडळींना त्यावेळेला शेतात जावे लागते आणि भर अंधारात आपल्या पिकांना पाणी द्यावे लागते. हे सर्वात प्रथम टाळले पाहिजे. याचे कारण म्हणजे यात त्या शेतकर्याच्या जीवालाच धोका होऊ शकतो. महाराष्ट्राच्या नागरी भागामध्ये सर्वत्र बिबट्यांचा मुक्त संचार आहे.

# राज्य शिक्षक संघाच्या अमरावती महानगरपालिका अध्यक्षपदी प्रविण पाटील यांची नियुक्ती




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

राज्य शिक्षक संघाच्या अमरावती महानगरपालिका अध्यक्षपदी प्रविण पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष व राज्य शिक्षक संघाचे प्रमुख मार्गदर्शक संजय खोडके यांच्या हस्ते त्यांना राज्य शिक्षक संघाच्या जिल्हा व महानगर अधिवेशनात नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

महानगरपालिकेच्या क्षेत्रात शिक्षकांना भेडसावणा-या समस्या व अडचणी सोडविण्याकरिता राज्य शिक्षक संघ कार्यरत आहे. या संघाच्या माध्यमातून शिक्षकांच्या मागण्यांसह अडचणी शासनापर्यंत पोहोचवून त्याची सोडवणूक करण्यात येते. राज्य शिक्षक संघाच्या महानगरपालिका शाखेच्या अध्यक्षपदी मनपा मराठी मुलींची शाळा बुधवारा या शाळेतील शिक्षक प्रविण पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. राज्य शिक्षक संघाच्या अधिवेशनात त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी राज्य शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष दिलीप कडू, कार्याध्यक्ष भोजराज काळे व ललित चौधरी उपस्थित होते.

गेल्या पंचवीस वर्षापासून ते महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात कार्यरत असून शिक्षकांच्या प्रश्नांची त्यांना असलेली जाण व अभ्यास बघता त्यांना या पदावर नियुक्त करण्यात आले आहे. त्यांच्या नियुक्तीचे शिक्षण क्षेत्रातून अभिनंदन करण्यात येत आहे.




# डायबिटीस असणाऱ्या व्यक्तींनी नारळपाणी प्यायलं तर चालतं का? बघा तज्ज्ञ काय सांगतात



**दि.२ विदर्भ प्रजासत्ताक आरोग्य**

सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू झाले आहेत. त्यामुळे काही खाण्याची इच्छा आपोआपच कमी होते. काहीतरी खाण्यापेक्षा थंडगार असं काहीतरी प्यावं वाटतं. त्यामुळे मग लिंबू सरबत, कोकम सरबत, पन्हं, नारळपाणी अशी पारंपरिक पेय पिण्याकडे आपला कल थोडा जास्त असतो. अशी पेयं प्यायल्याने उन्हाळ्यात डिहायड्रेशनचा त्रास होत नाही. सर्वसामान्य लोकांसाठी हे सगळं ठिक आहे. पण ज्यांना डायबिटीस किंवा मधुमेह असतो त्या लोकांना मात्र हे सगळे पेय घेताना निश्चितच विचार करावा लागतो. कारण हे सगळे पेय गोड असतात. आता त्यातल्या त्यात नारळपाणी हे एक नॅचरल पेय आहे. त्यामुळे डायबिटीस असणाऱ्या व्यक्ती ते जास्त प्रमाणात पितात पण खरंच नारळपाणी पिणं मधुमेह असणाऱ्या व्यक्तींसाठी योग्य असतं का? त्यामुळे त्यांची शुगर वाढू शकते का? याविषयी तज्ज्ञ काय सांगतात ते एकदा पाहायलाच हवं..

**डायबिटीस असणाऱ्या व्यक्तींनी नारळपाणी प्यायलं तर चालतं का?**

डायबिटीस असणाऱ्या व्यक्तींनी नारळपाणी प्यायलं तर ते त्यांच्यासाठी कितपत योग्य ठरू शकतं, याविषयी माहिती सांगणारा व्हिडिओ आहारतज्ज्ञांनी nutrilicious.byritajain या इंस्टाग्राम पेजवर शेअर केला आहे.

महागडं ड्रॅगन फ्रुट विकत घेण्यापेक्षा आता रोपच लावा मोठ्या कुंडीत! बघा ट्रिक- ताजे ड्रॅगन फ्रूट खा भरपूर यामध्ये त्यांनी २ महत्त्वाचे मुद्दे सांगितले आहेत. त्यापैकी पहिला मुद्दा म्हणजे ज्याप्रमाणे प्रत्येक फळामध्ये नैसर्गिकपणे साखरेचे प्रमाण असते, तसेच ते नारळपाण्यामध्येही असते. त्यामुळे जर तुम्ही १०० ते १५० मिली एवढं नारळपाणी पित असाल तर ते योग्य आहे. त्यामुळे रक्तातील साखर वाढणार नाही. पण त्यापेक्षा जास्त प्रमाणात किंवा एक अख्खं नारळपाणी तुम्ही एकाचवेळी घेत असाल तर त्यामुळे मात्र रक्तातील साखर वाढू शकते.

जर तुम्हाला १०० किंवा १५० मिलीपेक्षा जास्त नारळ पाणी प्यायचंच असेल तर त्यामुळे मात्र एकदम शुगर स्पाईक होऊ शकते. म्हणजेच रक्तातील साखर एकदम वाढू शकते.त्यामुळे नारळपाण्यात एक चमचा भिजवलेला सब्जा किंवा चिया सीड्स किंवा जवस टाकून घ्यावे. यामुळे शरीरातील साखरेचे प्रमाण एकदम वाढणार नाही, असा सल्ला त्यांनी दिला आहे.

# महिलांविरुद्ध अत्याचाराचे उच्चाटन करण्यासाठी प्रसार माध्यमांचा सकारात्मक उपयोग आवश्यक - डॉ. दया पांडे

## विद्यापीठात पंधराव्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे पाचवे सत्र संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

मानवी वर्तनावर प्रभाव टाकणारा सर्वात प्रभावी घटक म्हणजे प्रसारमाध्यमे होय. प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडियांवरून विविधांगी अभिव्यक्ती सतत सुरू असते. वृत्तपत्रे, नियतकालिके, टिव्ही, रेडिओ यांसारख्या माध्यमांप्रमाणेच फेसबुक, इंस्टाग्राम सोशल मिडिया अशा नव्या माध्यमांचा वापर समाजात वाढला आहे. मनोरंजन ही मानवी जीवनाची एक महत्त्वाची आवश्यकता आहे. मात्र समाजात अलीकडे त्याच्या नावाखाली अतिशय उन्माद सुरू आहे. महीलांविरुद्ध अत्याचारांमध्ये वाढ होण्यासाठी प्रसारमाध्यमांवरील असे सवंग चित्रण कारणीभूत ठरत असल्याचे दिसून आले आहे. चित्रपट, गाणी, रिल्स, छायाचित्रे, जाहिराती यांमधून स्त्रियांचे चित्रण रूढीवादी स्वरूपाचे होत असते. यासाठी भांडवली बाजारपेठचे अर्थ राजकारणासोबतच पितृसत्ताक समाजात स्त्रियांप्रती बाळगण्यात येणारा दृष्टीकोनही कारणीभूत आहे.



प्रसारमाध्यमे कालपरत्वे नव्या रुपात येतीलच, ती समाजाची गरज राहणार आहे. मात्र ही प्रसारमाध्यमे हाताळणारी जी माणसे आहेत, त्यांचा स्त्रियांप्रतीचा दृष्टीकोन बदलणे अत्याआवश्यक आहे. त्यासाठी समाजात अस्तित्वात असणाऱ्या पुरुषसत्ताक विषमतेचे निर्मूलन करणे आवश्यक आहे. प्रसारमाध्यमांचा त्यासाठी सकारात्मक उपयोग होऊ शकतो. आजवर प्रसारमाध्यमांमधून बऱ्याच प्रमाणात स्त्रियांचे चांगले चित्रण सुद्धा झाले आहे. मात्र हे प्रमाण अधिक वाढणे आवश्यक आहे. प्रसारमाध्यमांचा असा सकारात्मक दृष्टीकोन महिलांविरुद्धच्या अत्याचारांचे निर्मूलन करण्यासाठी उपयुक्त ठरू शकेल, असे प्रतिपादन अमरावती येथील भारतीय महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. दया पांडे यांनी केले.संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभाग आणि विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषद, ब्रह्मपुरी, जि. चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय पंधराव्या राज्यस्तरीय अधिवेशनाच्या पाचव्या सत्रात 'महिलांवरील अन्याय अत्याचारात प्रसार माध्यमांची भूमिका' याविषयावर विषयतज्ज्ञ म्हणून मांडणी करताना डॉ. दया पांडे यांनी आपले विचार व्यक्त केले.

डॉ. सीमा शेटे यांनी स्त्रियांच्या जीवनातील विविध समस्यांचे वर्णन करून त्यामागील कारणांचा वेध घेतला. स्त्रियांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रसारमाध्यमांचा आणि पर्यायी माध्यम संस्कृतीचा प्रभावी उपयोग करण्याची आवश्यकता आपल्या प्रतिपादनात व्यक्त केली.

सत्राचे अध्यक्ष म्हणून मांडणी करताना डॉ. के. बी. नायक म्हणाले, स्त्रियांच्या समस्या या केवळ स्त्रियांच्या नसून त्या संपूर्ण समाजाच्या आहेत. महिलांवरील अत्याचाराचे वाढते प्रमाण चिंताजनक आहे. बाजारीकरण आणि पुरुषसत्ताक सामाजिक संरचनेच्या चिकित्सेतून त्याच्या प्रतिबंधाकडे प्रभावीपणे जाता येऊ शकेल.सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ. नीलिमा दवणे यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# दुग्ध व्यवसायात वासरांची शिंगे जाळण्याचे फायदे; शिंगे जाळण्याच्या पद्धती

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**
**कृषी**

दुग्ध व्यवसाय करत असतांना कालवड संगोपणात महत्वाचे असते ते म्हणजे वासरांचे शिंग जाळणे.

वासरांची शिंगे काढण्याच्या या प्रक्रियेला डिसबडिंग असेही म्हणतात. यामध्ये वासरू लहान असतानाच त्यांची शिंगनळी जाळली जाते, ज्यामुळे शिंगांची वाढ थांबते.दूध उत्पादनाच्या दृष्टीने शिंगांचे फारसे महत्त्व नसते, त्यामुळे शिंगे लवकर काढणे एक उपयुक्त पद्धत आहे.

**शिंगे काढण्याची पद्धत**


शिंगनळी जाळताना वासरू फारसे मोठे नसावे, म्हणजे एका आठवड्याच्या आतच हे करणे योग्य ठरते. यावेळी शिंगाच्या वाढीला कारणीभूत असलेल्या पेशी नष्ट केल्या जातात. यामुळे शिंगाचे मूळ कपालयुक्त कवटीपासून वेगळे होऊन सहजपणे काढता येते.











**शिंगे काढण्यासाठी विविध पद्धती**

लाल तापलेले लोखंड शिंगनळी जाळण्यासाठी लाल तापलेले लोखंड वापरले जाते. जखमेवर अँटिसेप्टिक क्रीम लावणे आवश्यक असते.

रासायनिक पद्धत शिंगांच्या वाढीस अटकाव करणारे रसायन लावले जाते.

शिंगे काढल्यावर जर तेथे कीटक झाल्यास जखमेवर फ्लाय रिपेलेंट लावणे आवश्यक असते.

**शिंगे काढण्याचे योग्य वय**

गायीचे वासरू : १० ते १५ दिवसांचे वय असताना शिंगनळी जाळावी.

म्हशीचे वासरू : ७ ते १० दिवसांचे वय असताना शिंगनळी काढणे योग्य ठरते.

**शिंगे काढण्याचे फायदे**

शिंगे नसलेल्या जनावरांना कमी जागेत ठेवता येते. परिणामी जागेची बचत होते.

शिंगे नसल्यामुळे कर्करोगाची शक्यता कमी होते.

शिंगे नसलेल्या जनावरांची काळजी घेणे व त्यांना हाताळणे अधिक सोपे जाते.

काही प्रजातींच्या शिंगे आत वळलेली असतात, त्यामुळे त्याने जखम होण्याचा धोका असतो.

वासरांची शिंगे काढणे ही एक सुरक्षित प्रक्रिया आहे. यामुळे जनावरांचे आरोग्य आणि व्यवस्थापन सुलभ होते. योग्य पद्धतीने आणि वेळेवर ही प्रक्रिया केल्यास जनावरांना त्रास होत नाही.

# 'पीएम श्री'साठी मनपाच्या पाच शाळांचा समावेश : निकष पूर्ण झाल्यास अत्याधुनिक साहित्य मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

केंद्र शासनाकडून राबवण्यात येणाऱ्या । श्री' योजनेंतर्गत प्राथमिक स्तरावर जिल्ह्यातील १३ शाळांची निवड (बेंचमार्क) ! यु डाएस' पोर्टलद्वारे करण्यात आली आहे; मात्र, यापैकी ज्या शाळा शासनाचे निकष पूर्ण करतील, त्याच शाळांना केंद्र शासनाकडून अत्याधुनिक शैक्षणिक साहित्य व इतरही सुविधा उपलब्ध होणार असल्याने सदर शाळेला विशेष शाळेचा दर्जा मिळतो. त्यामुळे या शाळांमध्ये आता स्पर्धा निर्माण झाली आहे. त्यात महापालिकेचीपूर्व माध्यमिक उर्दू शाळा क्र ९ नूरनगर, अल्लमा इकबाल मनपा उर्दू शाळा क्र.२, मनपा हिंदी शाळा क्र १९, मनपा उर्दू शाळा क्र.७मुजफ्फरपुरा, मनपा मराठी शाळा क्र १४ वडाळी, मनपा उर्दू हायस्कूल जमील कॉलनी समावेश आहे.

पीएमश्री योजनेच्या तिसऱ्या टप्प्याची अमलबजावणी यंदा सुरू आहे. या योजनेंतर्गत सरसकट सर्वच शाळांची निवड केल्या जात



नाही, तर ढोबळमानाने ज्या शाळांमध्ये बऱ्यापैकी परिसर व इतर सुविधा असेल, त्यांची त्या एक बेंचमार्क शाळा म्हणून केंद्र शासनाकडून प्राथमिक निवड केली जाते. त्यानंतर त्या शाळा व्यवस्थापनाकडून शाळेविषयी ऑनलाइन माहिती हिती भरून घेतली जाते.त्यानुसार संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांना शाळेविषयी शासनाला ऑनलाइन माहिती पुरविली असून, २७ मार्च रोजी माहिती भरण्याची ही मुदत संपली आहे.मोर्शी नगर परिषदेची उर्दू हायस्कूल, तळेगाव मंत्री शाळा फ्रीस्पे इंडिया दशासर येथील जि.प. माध्यमिक स्कूल, अंजनगाव सुर्जी नगर परिषदेचे उर्दूमाध्यमिक विद्यालय, जि.प. माध्यमिक कन्या शाळा कॅम्प अमरावती, इंग्रजी माध्यमाची शासकीय निवासी शाळा अमरावती, जि.प. माध्यमिक शाळा धारणी, जि.प. माध्यमिक मुलांची शाळा अमरावती तसेच महापालिकेच्या पाच या शाळांची बेंचमार्क शाळा म्हणून निवड - करण्यात आली आहे. शासनाच्या निकषांनुसार पीएमश्रीसाठी पात्र होण्याकरिता शाळेची सुरक्षित इमारत, स्वच्छ आणि सुंदर परिसर, प्रयोगशाळा, क्रीडांगण आदी सुविधा असणे आवश्यक आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# हलक्या स्वरुपात पावसाच्या सरी कोसळल्याने अमरावतीकरांना उकाड्या पासून दिलासा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

गत काही दिवसांपासून असह्य उकाडा अन् अंगाची लाहीलाही करणाऱ्या उन्हाच्या झळांमुळे हैराण झालेल्या अमरावतीकरांना ढगाळ वातावरण व नंतर पडलेल्या पावसाच्या सरी मुळे चांगलाच दिलासा मिळाला. मंगळवारी सकाळपासून आकाशात ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने सर्वत्र अवकाळी पाऊस पडेल की काय? असे वाटत होते.रात्री उशिरा जिल्ह्यातील हवेत गारवा निर्माण झाला असून रोज कडक उन्हाचा अनुभव घेणाऱ्या शहरवासीयांना यातून सुटका मिळाली.

मार्चच्या सुरवातीपासून शहरातील कमाल तापमान ३४ ते ३६ अंश सेल्सिअसदरम्यान होते. सकाळी ९ वाजल्यापासून वातावरणात उष्मा वाढत होता. सायंकाळी सहापर्यंत उन्हाची तीव्रता कायम राहत असल्याचे चित्र आहे. दुपारी उन्हाच्या झळा असह्य वाटत असल्याने नागरिक घराबाहेर पडणे टाळत आहेत. त्यामुळे रस्त्यावरील वर्दळ घटल्याचा प्रत्यय येत आहे. त्यामुळेच दुपारी शहरातील बहुतांश रस्ते निर्मनुष्य होत आहेत. उन्हापासून बचाव करण्यासाठी नागरिक टोपी, रुमाल, छत्री तसेच स्कार्फचा वापर करीत आहेत. घरातील पंखे, कुलर रात्रंदिवस सुरू ठेवावे लागत आहेत. तीव्र उन्हाच्या झळांनी अवघ्या शहराला घाम फुटलेला असताना मंगळवारी मात्र सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते व रात्रीच्या सुमारास हलक्या स्वरूपात पावसाने हजेरी लावली.

# महापालिकेच्या मालमत्ताकराची वसुली पोहचली ९६ कोटी वर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

मालमत्ता कर हा महापालिकेचा उत्पन्नाचा एकमेव स्त्रोत आहे. इतिहासात पहिल्यांदाच मालमत्ता करातून अपेक्षेपेक्षा कमी मात्र गतवर्षी पेक्षा दुप्पट कर वसूली झालेली आहे. दरवर्षी थकीत व चालू मागणीसह ४० कोटीची वसूली होत असतानाच यावर्षी मार्च एडिंगपर्यंत ९६ कोटींची वसूली करण्यात आली. ही वसूली करतानाच मनपाने मालमत्ताधारकांना ६ कोटी ७५ लाख रुपयांची सुट दिली आहे.

महापालिकेच्या इतिहास पहिल्यांदाचरेकॉर्डतोड वसूली झालेली असली तरी ती अपेक्षेपेक्षा कमी आहे. जून्याच दराने नवीन वसुली ही २५४ कोटी इतकी आहे. त्यामध्येचालू सन २०२४-२५ ची ९३.६० कोटी तर थकीत कर वसूली १६० कोटी इतकी आहे. जून्याच दराने कर वसुली करण्यात आलीअसूनही मालमत्ताधारकांकडून अपेक्षेनुसार प्रतिसाद मिळाला नाही. विशेष म्हणजे महापालिकेने गेल्या काही महिन्यापासून पाचहीझोनमध्ये थकीत वसूली करिता ठिकठिकाणी शिबिर लावले तसेच सुट्टीच्या दिवशी ही वसुली करण्यात आली. जानेवारीच थकीत वसूलीकरिता महापालिकेने जप्तीची कारवाई करण्याचा निर्णय घेतला. जप्तीच्या नोटिसमुळे ऑनलाइन क ऑफलाइन वसुलीचा आकडा वाढत गेला गतवर्षी महापालिकेने ६२ कोटी करवसूली केल होती.



**बड्या मालमत्ताधारकांकडे दुर्लक्ष**

महापालिकेत ३९०५ मालमत्ता धारकांकडे १५० कोटीपेक्षा अधिक थकीत आहे. त्यामध्ये शासकीय कार्यालयांकडे चारपार कोटीपेक्षा अधिक असून मॉल, हॉस्पीटल्स, शाळा, महाविद्यालय, मार्केट, मंगल कार्यालयांचा समावेश होता. गरिब व मध्यमवर्गीय मालमत्ताधारकांना थकीत कराचा भरणा करणाऱ्या प्रशासनाने त्यांच्याकडूनच कराचा भरणा केला. बड्या मालमत्ताधारकांकडे मात्र दुर्लक्षच केले, असा आरोप जनतेकडून केला जात आहे. बड्या मालमत्ताधारकांवर एकही जप्तीची कारवाई का करण्यात आली नाही. त्यांना मनपा अधिकारी अभय तर देत नाही ना, असा देखील आरोप कर अदा करणाऱ्या मालमत्ताधारकांकडून केला जात आहे.

**थकितमध्ये ७० हजार भूखंडधारकांचा समावेश**

करमूल्यांकनात शहरात ७० हजार भुखंड असल्याचे समोर आले. या भूखंडाचे कर निर्धारण होऊनही त्यापैकी एकाही भूखंडधारकाने कराचा भरणा केलेला नाही. त्यामुळे या भुखंडधारकांकडे कोट्यवधीचा कर थकीत आहे. मालमत्ताधारकांची संख्या २ कोटी २३ लाख असून त्यामध्ये नवीन मालमत्ताधारकांची संख्या अधिक आहे.

# दुचाकी अपघातात दोघे ठार : गिरगुटी-अंबापाटी मार्गावरील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२चिखलदरा**

मेळघाटातील गीरगुटी-अंबापाटी मार्गावर मंगळवारी (ता. एक) अनियंत्रित दुचाकीच्या अपघातात दोन आदिवासी तरूणांचा दुर्दैवी मृत्यु झाला. परशुराम बाबुलाल बेलसरे (क्य ४०) आणि प्रदीप शंकर जामूनकर (वय ३२, दोघे रा. गीरगुटी ता. चिखलदरा) अशी मृतांची नावे आहेत. ही घटना मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत खोंगडा व्याघ्र परिक्षेत्रांतर्गत 'पंपानाला' नियतक्षेत्र नजीक घडली आहे.

पोलिस सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार, भरधाव दुचाकी चालकाचे नियंत्रण सुटून अनियंत्रित दुचाकी वळणमार्गावर






रस्त्यावर कोसळून भीषण अपघात घडला. रक्तबंबाळ अवस्थेत दोघांनाही प्राथमिक आरोग्य केंद्र टेम्बूसोंडा येथे घेऊन जात असतांनाच त्या दोघांचाही मृत्यू झाला. अपघातग्रस्त हिरो होंडा शाईन (एम.एच. २७-डी.क्यू ३४२३) ही दुचाकी की मृताच्या मालकीची असून तो व त्याचा सोबती असे दोघे राहत्या गावाकडे जात होते. यादरम्यान चालकाचे नियंत्रण सुटून अनियंत्रित दुचाकीचा गीरगुटी-अंबापाटी मार्गावर भीषण अपघात घडला. अपघात ऐवढा भीषण होता की दोघांच्या डोक्यावर गंभीर दुखापत झाली. अतिरक्तस्त्रा व वेळेवर उपचार न मिळाल्यामूळे दोघांचाही वाटेतच मृत्यू झाला.चिखलदरा पोलीसांनी घटनास्थळी दाखल होत पंचनाम्यापश्चात टेम्बूसोंडा येथे पोहोचून माहिती घेतली. पोलीस दप्तरी गुन्हा नोंदवून दोघांच्याही मृतदेहाची वैद्यकीय तपासणी आटोपून दोन्ही मृतदेह अंतिम संस्कारासाठी कुटुंबियांच्या स्वाधीन केले. चिखलदरा ठाणेदारांच्या मार्गदर्शनात पीएसआय राठोड तपास करीत आहेत.

# अंजनगावसुर्जीत १९ क्विंटल शासकीय तांदूळ पकडला

## पोलिसांची कारवाई मात्र पुरवठा विभाग निद्रिस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अंजनगाव सुर्जी**

अंजनगावसुर्जी पोलिसांनी नवीन बसस्थानकाजवळील परतवाडा रस्त्यावर तांदूळ भरलेला टाटा (एसीई) वाहन (एमएच ४८ टी ५४९२) वाहन पकडले. या वाहनात १९ किंटल ६०० ग्रॅम तांदूळ आढळून आला. संबंधित तांदूळ शासकीय असल्याचा व तो विक्रीसाठी पाठविला जात असल्याचा संशय आहे. संबंधित तांदूळ शासकीय नाही, असे रेटण्याचा जोरदार प्रयत्न पुरवठा विभागाकडून केला जात आहे.




केंद्र सरकार देशभरातील प्रत्येक गरीब कुटुंबाला (८० कोटी लोक) रेशन दुकानांमधून दरमहा ३ किलो तांदूळ आणि २ किलो गहू मोफत दिला जातो. सरकारच्या या योजनेचा मुख्य उद्देश देशातील कोणताही व्यक्ती उपाशी राहू नये हा आहे. परंतु काही महाभागांनी त्याचा व्यवसाय उभा केला आहे. ते घरोघरी जाऊन लोकांना रेशन दुकानामधून मोफत मिळालेला तांदूळ कमी किमतीत खरेदी करतात आणि वाहनांमध्ये भरून तो काळ्या बाजारात विक्रीसाठी नेतात. यासाठी तांदूळ माफियांचे मोठे नेटवर्क संपूर्ण तालुक्यात पसरलेले आहे. येथील तहसील कार्यालयातील अन्न पुरवठा तपासणी अधिकारी रणजित रामाघरे यांच्या निष्काळजीपणा त्याला कारणीभूत असल्याचे काही जाणकार सांगत आहेत. रेशन तांदूळ विकत घेण्याचा व तो बाजारात चढ्या दराने विकण्याचा अवैध व्यवसाय उघडपणे सुरू आहे. मात्र त्याविरुद्ध आतापर्यंत कोणतीही कारवाई न पुरवठा विभागाने केलेली नाही. शहरात माफियांनी दुकाने उघडली आहेत जिथे दररोज खुलेआम रेशनचा तांदूळ खरेदी केला जातो आणि गोदामात साठवला जातो, अशी माहिती आहे. असे असताना अन्न पुरवठा निरीक्षक अधिकारी रणजित रामाघरे यांच्या वरदहस्ताने हा प्रकार सुरू असल्याचे बोलले जात आहे. परंतु अंजनगावसुर्जी पोलिसांनी सरकारी तांदूळ जप्त करून तांदूळाच्या गोरखधंद्याचा पर्दाफाश केला आहे.परतवाडा येथील माफिया तांदूळ विक्रीसाठी नेत असल्याची माहिती अंजनगाव पोलिसांना मिळाली. त्या आधारावर पोलिसांनी ही धडाकेबाज कारवाई केली.

# राजू शेट्टी म्हणतात ! सर्वच राजकीय पक्ष लबाड..

## शेतकऱ्यांची थट्टा करणाऱ्या विमा कंपन्यांच्या कार्यालयात घुसून आंदोलन करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

शेतकरी पीकविमाच्या मुद्यावरून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. पंधरा दिवसाच्या आत शेतकरी पीकविमाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा न केल्यास स्वाभिमानी शेतकरी संघटने कडून विमा कंपनीच्या कार्यालयात घुसून आंदोलन करणार असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी जिल्हा मराठी पत्रकार भवन येथे मंगळवारला पत्र परिषदेतून दिला आहे.



सध्या राज्यात शेतकरी अडचणीत सापडलेला आहे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याचा सरकारच्या धोरणामुळे वाटोळ झाला आहे खरेदी करण्यासाठी सरकारने मोठा गाजावाजा केला मात्र खरेदी केंद्र सुरू नाहीत सोयाबीन खरेदीसाठी नोंद केलेल्या शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी केल्या गेले नाही मात्र व्यापाऱ्यांचा सोयाबीन खरेदी करण्यात आला असल्याचे राजू शेट्टी म्हणाले शेतकऱ्यांना जातीपातीच्या नावाने झुंजवत ठेवायचं मते घ्यायची मात्र निवडून आल्यावर शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडायचं निवडणुकीपूर्वी महाविकास आघाडीने तीन लाख पर्यंतच्या कर्ज माफ करण्याची घोषणा केली होती तर महायुती सरकारने शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू अशी घोषणा केली होती मात्र आता उपमुख्यमंत्री अजित पवारअजित पवार यांनी शेतकऱ्यांना ३१ मार्चपर्यंत कर्ज भरण्याचे आवाहन केले आहे. इतकेच नाही तर याच वर्षी काय ? पुढच्या वर्षी देखील शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार नसल्याचे त्यांनी थेटच सांगितले आहे.पत्र परिषदेला खासदार राजू शेट्टी, युवा आघाडी प्रदेशाध्यक्ष दामू अण्णाइंगोले, परभणी जिल्हा अध्यक्ष किशोर ढगे, अमित अढाऊ, प्रविण मोहोड, अमोल महल्ले, भगवंत ब्राम्हणवडे, स्वप्नीलकोठे, कुंदनकाळे, दिनेश आमले, प्रशांत शिरभाते, राजू राठी, प्रफुल्ल उमरकर, संजय आपकाजे सतीश शेळके उपस्थित होते.

**सर्वच राजकीय पक्ष लबाड**

निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना राजकीय पक्षआश्वासनाची खैरात वाटतात मात्र निवडणुका झाल्यानंतर शेतकऱ्यांनाविसरून जातातसर्वच राजकीय पक्ष लबाड़ असल्याचे टिका राजू शेट्टीयांनी केली.


# ४३,२९० शेतकऱ्यांना मिळणार व्याजमाफी योजनेचा लाभ

## डॉ. पंजाबराव देशमुख व्याजमाफी योजना : १२ हजार ७१० शेतकऱ्यांना ३ टक्के व्याज माफीकरिता ३० एप्रिलची डेडलाइन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील ४३ हजार २९० शेतकऱ्यांनी मुदतीमध्ये पिककर्जाचा भरणा केल्याने सदर शेतकरी शासनाच्या डॉ. पंजाबराव देशमुख व्याजमाफी योजनेकरिता पात्र झाले आहेत. त्यामुळे या शेतकऱ्यांना ६ टक्के व्याजमाफीचा लाभ मिळणार आहे. अद्यापही थकबाकीदार असलेल्या १२ हजार ७१० शेतकऱ्यांनी ३० एप्रिलपर्यंत पिककर्जाचा भरणा केल्यास त्यांना ३ टक्के व्याजमाफीचा लाभमिळणार आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने जिल्ह्यातील ५६ हजार शेतकऱ्यांना खरीपाचे सर्वाधिक ६४७ कोटींचे पिककर्ज वाटप केले आहे. शेतकऱ्यांना कर्ज



भरण्याकरिता ३१ मार्चची डेडलाइन देण्यात आली होती. ज्या शेतकऱ्यांनी ३१ मार्चपर्यंत कर्जाचा भरणा केल्यास अशा शेतकऱ्यांना शासनाच्या डॉ. पंजाबराव देशमुख व्याजमाफी योजनेंतर्गत ६ टक्के व्याजमाफ केले जाते. म्हणजेच शेतकऱ्यांना शून्य टक्के कर्जाचा फायदा होता. अशातच जिल्हा बँकेतील ५६ हजार शेतकऱ्यांपैकी २४३ हजार २९० शेतकऱ्यांनी ५४० कोटी रुपयांच्या कर्जाचा भरणा ३१ मार्चपर्यंत केल्याने सदरचे शेतकरी व्याजमाफी योजनेकरिता पात्र झाले आहेत. यातून अद्यापही १२ हजार ७१० शेतकऱ्यांनी कर्जाचा भरणा केला नाही. त्यामुळे त्यांच्याकरिता आता ३ टक्के व्याजमाफीची सवलत या योजनेंतर्गत देण्यात आली आहे. याकरिता त्यांना ३० एप्रिलची डेडलाइन देण्यात आली आहे.

# 'झेडपी'ला २७६ कोटी ५७ लाखांचा धनलाभ : मागील वर्षीच्या तुलनेत यंदा पाचपट निधी मिळाला

## रात्री १२.३० वाजेपर्यंत सुरू होते वित विभागाचे कामकाज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अमरावती**

जिल्हा परिषदेच्या विविध विभागांना मार्च एण्डला २७६ कोटी ५७ लाख ३७ हजार ३४५ रुपयांचा धनलाभ झाला आहे. त्यामुळे सदरचा निधी विविध शिर्षांमध्ये विविध विभागाला वितरीत करण्यात आला. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे पाचपट निधी अधिक मिळाला. रात्री १२.३० वाजेपर्यंत वित्त विभागाचे कामकाज सुरू होते.जिल्हा परिषदेला मार्च एण्डिगच्या तोंडावर शासनाकडून विविध शिर्षामध्ये २९ मार्च दुपारपर्यंत १०४ कोटी ५४ लाख २ हजार ४१८ रुपयांचा निधी प्राप्त झाला असताना २९ ते ३० या दोन दिवसांत यामध्ये पुन्हा १०० कोटी ७७ लाखांची भर पडली. तर ३१ मार्चला रात्री उशीरापर्यंत पुन्हा ७१ कोटी २५ लाख ९० हजार १२० रुपयांचा धनलाभ




जिल्हा परिषदेला झाला आहे. निधी प्राप्त करण्याकरिता ३१ मार्च शेवटची तारीख असल्याने वित्त विभागातील कर्मचारी शासकीय सुटी असताना देखील सोमवारी सकाळपासूनच कार्यालयात सज्ज झाले होते. रात्री १२.३० वाजेपर्यंत विविध शिर्षांवर निधी प्राप्त करण्याची कारवाई सुरू होती. त्यामुळे या विभागातील अधिकारी, कर्मचारी रात्री १ ते १.३० वाजेपर्यंत कार्यालयात कार्यरत होते. जिल्हा परिषदेत २६ ते ३० या पाच दिवसांत २०५ कोटी ३१ लाख ४६ हजार ३२५ रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. तर ३१ मार्च रोजी यात पुन्हा ७१ कोटी ५७ लाख ९० हजार ९२० रुपयांचा भर पडल्याने एकूण २७६ कोटी ५७ लाख ३७हजार ३२५ रुपयांचा निधी प्राप्त झाला. मागील वर्षी मार्च एण्डिगला ५३ कोटी मिळाले होते. यंदा यात पाचपट वाढ झाली आहे. सदरचा निधी आरोग्य, शिक्षण, पंचायत, सिंचन, पशुसंवर्धन, बांधकाम, समाजकल्याण, पंचायत, पाणीपुरवठा विभाग आदी विविध विभागांना सदरचा निधी वळता करण्यात आला आहे. सीईओ संजिता महापात्र ह्या स्वतः या संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेऊन होत्या.

# सीपींच्या हस्ते दोन सेवानिवृत्त पोलिसांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी आज १ एप्रिल रोजी पोलिस आयुक्तालयाच्या सभागृहात सेवानिवृत्त झालेल्या दोन पोलिस अधिकाऱ्यांचा सहपत्नीक सत्कार केला. सीपी रेड्डींनी सेवानिवृत्त झालेल्या पोलिसांना शाल, श्रीफळ, स्मृती चिन्ह, सेवानिवृत्तीचे प्रमाण देऊन त्यांना दिर्घ निरोगी आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या. तसेच अधिकाऱ्यांच्या पत्नीला साडी व कुंडीतील रोपटे देऊन त्यांचाही सत्कार केला.मुख्यालयाचे जीपी एसआय यज्ञेश्वर अंबुलकर, नियंत्रण कक्षातील एएसआय राजु पाचंगे अशी सेवानिवृत्त झालेल्या पोलिस अधिकाऱ्यांची नावे आहेत. सेवानिवृत्तीच्या काळात शासकीय योजना, सुविधांबाबत काही अडचणी आल्यास तात्काळ संपर्क करण्याचे सीपी रेड्डींनी सांगितले. सदर कार्यक्रमाला सीपी रेड्डी यांच्यासह डीसीपी कल्पना बारवकर, सागर पाटील, गणेश शिंदे, प्रशासन विभागाचे एसीपी शिवाजी बचाटे, पोलिस कल्याण शाखेचे पोलिस निरिक्षक संजय अढाऊ, प्रशासकीय अधिकारी किशोर शेंडे, कार्यालय अधिक्षक आरती आठवले व सेवानिवृत्त पोलिस अधिकारी, त्यांच्या कुटूंबातील सदस्य उपस्थित होते.

# 'अक्षरवैदर्भी' मासिकाचे डिजिटल युगात पदार्पण
# 'अक्षरवैदर्भी' मासिकाचा ऑनलाईन प्रकाशन सोहळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

जनसामान्यांच्या साहित्य, संस्कृती आणि कलाभिरुचीच्या संवर्धनासाठी समर्पित असलेले 'अक्षरवैदर्भी' हे लोकप्रिय मराठी मासिक आता नवीन रूपात वाचकांच्या भेटीला येत आहे. मासिकाने आपल्या ४२ व्या वर्षात पदार्पण केले असून, गुढीपाडवा आणि मराठी नववर्षाच्या शुभ मुहूर्तावर, म्हणजेच ३० मार्च रोजी, 'अक्षरवैदर्भी' ऑनलाईन स्वरूपात वाचकांसाठी उपलब्ध झाले.

यानिमित्त मासिकाचे ऑनलाईन उद्घाटन विभागीय माहिती उपसंचालक अनिल आलुरकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सहायक संचालक विजय राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.



अक्षरवैदर्भी डिजिटल स्वरुपात वाचकांना उपलब्ध झाल्याने मासिक सर्वदूर पोहोचणार असून वाचकांना कधीही ते वाचता येणार आहे. यामुळे मासिकाच्या वाचकांची संख्या व लोकप्रियता वाढणार, असे विभागीय माहिती उपसंचालक अनिल आलुरकर यांनी यावेळी सांगितले.

अक्षरवैदर्भी मासिक मुद्रीत स्वरुपात सलग ४१ वर्षे खंड न पडता वाचकांना उपलब्ध करण्यासाठी संपादक डॉ. सावरकर व त्यांच्या चमूने खूप मोठे परिश्रम घेतले आहे. जनसाहित्याची चळवळ भक्कम होण्यास यामुळे सहाय्यता झाली आहे. अक्षरवैदर्भी मासिक व त्याचे सर्व ४१ अंक ऑनलाईन उपलब्ध झाल्याने, मराठी भाषेच्या संशोधकांना संशोधनासाठी याचा फायदा होणार आहे. राज्यातील सर्वच कानाकोपऱ्यातील लेखक, कवी, साहित्यिकांचे लेख, कवितांचा संग्रह त्यात आहे. हे मासिक नक्कीच ग्लोबल होईल, अशा सदिच्छा सहायक संचालक विजय राऊत यांनी कार्यक्रमाप्रसंगी दिल्या.

मासिकाचे मुख्य संपादक डॉ. सुभाष सावरकर यांनी गेल्या ४१ वर्षांपासून नियमितपणे एकही अंक न चुकविता 'अक्षरवैदर्भी' वाचकांसाठी उपलब्ध करून दिले आहे. समाजातील सर्व स्तरांतील साहित्यप्रेमी आणि वाचकांसाठी त्यांनी नेहमीच दर्जेदार साहित्य पुरवले आहे. त्यांच्या या कार्यामुळे मासिकाचे राज्य, परराज्य आणि देशविदेशात अनेक वाचक झाले आहेत. अक्षरवैदर्भीच्या ऑनलाईन पदार्पणामुळे वाचकांना हे मासिक डिजिटल स्वरुपात उपलब्ध झाले असून या कार्यक्रमासाठी सर्वांनी भरभरून शुभेच्छा दिल्या.

सर्व साहित्याच्या प्रवाहात जनमाणसांच्या जीवनाचा जलनिष्ठ जाणीवांनी घेतलेला कलात्मक वेध म्हणजे जनसाहित्य, असे मत अक्षरवैदर्भी मासिकाचे मुख्य संपादक डॉ. सुभाष सावरकर यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी डॉ. सुभाष सावरकर यांच्या सुविद्य पत्नी सौ. निर्मला सावरकर, त्यांचे चिरंजीव इंजिनीअर समीर सावरकर, स्नुषा मिनल सावरकर, प्रा. अनिल प्रांजळे, डॉ. योगिता पिंजरकर, इंजिनीअर प्रकाश आमले, डॉ. निरंजनमाधव अंजनगर, प्रा. कृष्णकांत पराते, इजि. आशिष देशपांडे, रवी डहाके आणि अक्षरवैदर्भीचा संपूर्ण परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

अक्षरवैदर्भी च्या सुरवातीच्या काळात १९८४ मध्ये ज्यांनी प्रकाशनासाठी मदत केली ते प्रा. कृष्णकांत पराते तसेच इजि. आशिष देशपांडे यांचा मान्यवरांच्या हस्ते यावेळी सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. अनिल प्रांजळे यांनी तर डॉ. योगिता पिंजरकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला प्रा. सतीश तराळ, प्रा. लक्ष्मीधर मुळे, निलीमा मुळे, मंजू आमले, प्रा. दिनेश राऊत, प्रा. मनीष चोपडे, प्रा. शितल राऊत, संजय वाघुळे, डॉ. खोजरे तसेच कवी, साहित्यिक मंडळी प्रामुख्याने उपस्थित होती.

आता 'अक्षरवैदर्भी' मासिकाच्या माध्यमातून दर्जेदार साहित्य आणि वैचारिक लेखणी डिजिटल स्वरूपात वाचकांना सहज उपलब्ध होणार आहे, याचा आनंद साहित्यप्रेमींनी व्यक्त केला आहे.

# एमआयडीसीकडील मालमत्ताकर वसुलीचा मार्ग सुकर : लवकरच मिळणार ५ कोटीची थकबाकी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

महापालिकेच्या मालमत्ताकरात आणखी ४ ते ५ कोटी रुपयांची वाढ होण्याची शक्यता आहे. दोन वर्षापासून थकीत असलेला एमआयडीसीकडील मालमत्ता कर वसुलीचा मार्ग सुकर झाला आहे. एमआयडीसी अध्यक्ष किरण पातुरकर व मनपा आयुक्त - डॉ. सचिन कलत्रे यांच्यामध्ये झालेल्या बैठकीत जून्याच व निवासी - दराने करवसूली करण्याचा निर्णय घेण्यात आला.मालमत्ताकराची वसुली जून्या दराने करण्यात येणार असल्याचा निर्णय घेत निवासी मालमत्ता धारकांकडून वसुली सुरु करण्यात आली. दोन वर्षापासून एमआयडीसीमधील मालमत्ताधारकांची मनपा प्रशासनासोबत या विषयावर चर्चा सुरु होत्या. ४१२ मालमत्ताधारक एमआयडीसीमध्ये असल्याने प्रत्येकाने वेगवेगळ्या स्या प्रशासनाकडे मांडल्या होत्या. त्यामध्ये प्रामुख्याने वीज, रस्ते व नाल्यांचा प्रश्न होता. एमआयडीसी अध्यक्ष किरण पातुरकर यांनी बैठकीत सांगितले की, उद्योजकांनी



मालमत्ता कर भरण्यास नकार दिलेला नाही. मनपाकडून जरी सुविधा पुरविण्यात येत नसल्या तरी देखील कर भरण्यास उद्योजक तयार आहेत, मात्र त्याची आकारणी कर जून्या दराने करावी. सोबतच सातुर्णा औद्योगिक वसाहतीच्या समोरील मुख्य नवाथे रस्त्या पलीकडील क्षेत्र सुध्दा इंडस्ट्रियल झोन म्हणून घोषित आहे. शशीनगर, श्रीकांत नगरला इंड्रस्ट्रीयल झोन म्हणून मनपाने मान्यता देखील दिली आहे. तरी सुध्दा या उद्योजकांना व्यावसायिक दर लावलेले आहेत. त्यांनासुध्दा एमआयडीसी उद्योजकांप्रमाणे दर लावण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. मनपा प्रशासनाने उद्योजकांची बाजू समजून घेतली व जून्याच दराने वसुली करण्यात यावी असा निर्णय दिला. त्यामुळे आता जून्या दराने वसुली होणार असल्याने एप्रिलच्या पहिल्याच आठवड्यात शिबिर लावण्याच्या सूचना देण्यात आल्या. महापालिकेला एमआयडीसीमधून थकीत ४ ते ५ कोटी रुपयांचा कर प्राप्त होण्याची शक्यता आहे.बैठकीला मनपा आयुक्त डॉ. सचिन कलंत्रे, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, पुरुषोत्तम बजाज, डी. के. अग्रवाल, बंटी जगमलानी, प्रकाश राठी, आशिष सावजी, नंदकिशोर अग्रवाल, अजय पवार, राजेश अग्रवाल, दिपक अग्रवाल, शशीनगर इंडस्ट्रीजचे अध्यक्ष लाड, मानेकर, देशपांडे उपस्थित होते.

# यशवंत पंचायतराज अभियानात तिवसा पंचायत समिती अमरावती विभागातुन प्रथम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२तिवसा**



यशवंत पंचायतराज अभियान सन २०२४-२५ अंतर्गत अमरावती विभागाचा निकाल विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती व्दारे जाहीर झाला असुन, त्यानुसार विभागातील ५६ पंचायत समित्यांपैकी पंचायत समिती, तिवसा ला प्रथम क्रमांक प्राप्त झाला असल्याने पंचायत समिती तिवसा ११.०० लाख रुपयाचे बक्षीसाकरीता पात्र ठरली आहे. महाराष्ट्र शासनाव्दारे दरवर्षी यशवंत पंचायतराज अभियान बक्षीस योजना राज्यातील ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदेकरीता राबविण्यात येत असते. स्पर्धेतील सर्वोत्तम पंचायत समितीच्या निवडीकरीता विभागस्तरीय मुल्यमापन समितीव्दारे पंचायत समिती, तिवसा च्या कामकाजाची तपासणी करण्यात आली होती. पंचायत समिती, तिवसा अंतर्गत सामान्य प्रशासन विभागाव्दारे, महिला बालकल्याण विभागाव्दारे, आरोग्य विभागाव्दारे, कृषि विभागाव्दारे, पाणी पुरवठा विभागाव्दारे, मनरेगा विभागाव्दारे, शिक्षण विभागाव्दारे, वित्त विभागाव्दारे, पशुसंवर्धन विभागाव्दारे,समाजकल्याण विभागाव्दारे,पंचायत विभागाद्वारे, परिषद विभागाद्वारे राबविण्यात आलेल्या योजनांची तपासणी विभागस्तरीय मुल्यमापन समितीने केली होती. पंचायत समितीने केलेल्या कामगीरीप्रमाणे विभागस्तरीय मुल्यमापन समितीने केलेल्या गुणदाणानुसार विभागातील पाचही जिल्हयातील एकुण ५६ पंचायत समित्यांपैकी पंचायत समिती तिवसा ला सर्वाधिक गुण मिळाल्याने पंचायत समिती, तिवसा अमरावती विभागात प्रथम क्रमांकाकरीता पात्र ठरली. अमरावती विभागातुन पंचायत समिती, तिवसा प्रथम आली असल्याने पंचायत समिती, तिवसा ही विभागस्तरावरील ११.०० लाख रुपयाचे बक्षीसाकरीता पात्र ठरली आहे. तसेच त्यापुढील राज्यस्तरीय स्पर्धेकरीता पात्र ठरली असुन राज्यस्तरावरील मुल्यमापण समितीव्दारे पंचायत समिती, तिवसा ची तपासणी लवकरच होणार आहे.

पंचायत समिती, तिवसा विभागस्तरावरील प्रथम क्रमांकाचे ११.०० लाख रुपयाचे बक्षीसाकरीता प्राप्त झाल्याने पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. अभिषेक कासोदे व सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी पंचायत समिती, तिवसा चे सभागृहात दिनांक १ एप्रिल, २०२५ रोजी आनंदोत्सव कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी गट विकास अधिकारी यांनी राज्यस्तरीय स्पर्धेकरीता यापेक्षा जास्त जोमाने काम करण्याचे आवाहन पंचायत समिती, तिवसा चे अधिकारी कर्मचारी यांना केले. या कामगिरीसाठी मा.संजीता महापात्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अमरावती, श्रीमती प्रिती देशमुख, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, अमरावती, श्री.बाळासाहेब बायस, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) जि.प. अमरावती, सौ. कल्पनाताई दिवे, माजी सभापती तसेच पंचायत समितीचे सर्व माजी पदाधिकारी यांचे मार्गदर्शन लाभले.

# गुरूंचा कृतज्ञता सोहळा म्हणजे शिक्षकांच्या अथक परिश्रमाचे फळ

## माजी विद्यार्थ्यांच्या वतीने शिक्षकांचा सेवानिवृत्ती सोहळा : स्वा. श्री. अजाबराब काळे पाटील विद्यालय चुरणी येथे जुन्या आठवणींना उजाळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२चिखलदरा**

माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रति असलेल्या भावना व्यक्त करण्यासाठी त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्य आयोजित केलेला कृतज्ञता सोहळा हा खऱ्या अर्थाने शिक्षकांनी केलेल्या निस्वार्थी परिश्रमाचे फलीत असल्याचे प्रतिपादन चुरणी येथे कार्यरत असलेले केंद्रप्रमुख सुरेंद्र अर्डक यांनी केले.स्वा.श्री. अजाबराव काळे पाटील विद्यालय चुरणी येथील प्राचार्य श्री.अरविंद घोम व सहा.शिक्षक श्री. रवीकुमार देशमुख यांचा सेवानिवृत्ती सोहळा तसेच माजी विद्यार्थी मेळाव्याचे अध्यक्ष म्हणून ते यावेळी बोलत होते. शनिवारी २९ मार्च रोजी शाळेच्या प्रांगणात हा कृतज्ञता सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणूनचुरणी येथील सरपंच नारायण चिमोटे, उपसरपंच आशिष टाले, सत्कारमूर्ती प्राचार्य अरविंद घोम, सहा.शिक्षक रवीकुमार देशमुख,संदीप अलोकार, रवि सेमलकर, सौ.रंजना अलोकार, नरेंद्र अलोकार, पोलिस पाटील गोकुल झाडखंडे ,गणेश भातजोडे , घोमसर,राठोड सर , ढोके सर , सुधीर कवाणे, मुख्याध्यापक शंकरराव येवले,संजय पाटील, सौ.मायाताई घोम, सौ.अर्चनाताई देशमुख,विद्यार्थी प्रतिनिधी राहुल येवलेआदी मान्यवर विचारपीठावर उपस्थित होते. माजी विद्यार्थ्यांच्या वतीने अरविंद घोम व रवीकुमार देशमुख दाम्पत्यांचे गुरुपूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.१९९९ बॅच च्या वतीने यावेळी दोन्ही शिक्षकद्वयांचा मानपत्र तसेच शाल, श्रीफळ व ग्रामगीता देऊन सत्कार करण्यात आला. माजी विद्यार्थिनींच्या वतीने सुद्धा मानपत्र ,शाल, श्रीफळ देऊन अरविंद घोम व रविकुमार देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी १९९३ पासून शिक्षण घेणाऱ्या सर्व माजी विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी आपल्या लाडक्या शिक्षकांच्या सेवाकार्याप्रति कृतज्ञता व्यक्त करत त्यांचा सत्कार केला. यावेळी आपल्या सत्काराला प्रत्युत्तर देतांना सेवानिवृत्त प्राचार्य अरविंद घोम आणि रवीकुमार देशमुख अक्षरशः गहिवरून गेले होते. विद्यार्थ्यांनी केलेल्या या अनोख्या अयोजनाबाबत त्यांनी आभार व्यक्त करत विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या तर विद्यार्थ्यांनी आपल्या दोन्ही शिक्षकांना निरोप देत तीस वर्षांचे गुरू शिष्याचे ऋणानुबंध अधिक घट्ट केले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार मंगेश तायडे यांनी केले तर प्रास्ताविक व आभार काळे सर यांनी केले. या सोहळयाला आशिष निंबुरकर,नागेश मुंडे, प्रवीण येवले, आशिष गुढधे,मनोज मोर्से, हरीचरण बेलकर ,भारती मेश्राम, श्रद्धा टोम्पे, सोनाली पाटील, अरुण भगोरे, कल्पना अलोकार, वर्षा अलोकार, आशा येवले, अस्मिता काकडे, लता येवले,अलका येवले, पुष्पा येवले, रूपाली येवले , लक्ष्मी आठवले, परमानंद अलोकार, पवन अलोकार,नितीन वरखडे, मारोती पाटणकर, सुमित्रा बिसंदरे यांच्यासह १९९३ पासून चे माजी विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### २५ वर्षानंतर भेटले जुने मित्रमैत्रिणी

या मेळाव्याला दुरवरून माजी विद्यार्थी जमले होते. नागपूर, जळगाव, भुसावळ, अमरावती,बैतुल अश्या विविध ठिकाणांहून आलेली मित्रमंडळी तब्बल २५ वर्षानंतर एकमेकांना भेटले. सर्वांसाठी हा दुर्मिळ आणि आनंद देणारा योग होता. एकमेकांना भेटल्यानंतर जुन्या आठवणींना उजाळा मिळाला यावेळी प्रत्येकाचे डोळे पाणावले होते.

# रोहयोच्या मजुरीत १५ रुपये वाढ; १ एप्रिलपासून ३१२ रुपये

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अकुशल कामावर कार्यरत मजुरांच्या मजुरीत प्रति दिवस १५ रुपये वाढ करण्यात आली आहे. यामुळे मजुरांना २९७ऐवजी ३१२ रुपये मिळणार आहेत. ही दरवाढ १ एप्रिल २०२५ पासून लागू झाली असून, आर्थिक वर्ष २०२५-२६ संपेपर्यंत ही दरवाढ राहील, असे केंद्र शासनाने पत्राद्वारे जाहीर केले आहे.



ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील गरीब व कुटुंबांना वर्षभरात १०० दिवस रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची सुरुवात केली. महाराष्ट्रात ही योजना 'महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना' या नावाने कार्यरत

आहे. या योजनेत ५० टक्के कामे ग्रामपंचायत स्तरावर आणि उर्वरित ५० टक्के कामे इतर बांधकाम एजन्सीजमार्फत केली जातात. ग्रामपंचायतीमार्फत या कामांचे नियोजन, देखरेख आणि संनियंत्रण केले जाते. ग्रामसेवकांच्या मदतीसाठी रोजगार सेवकांची नियुक्ती ग्राम सभेतून केली जाते. पंचायत समिती स्तरावर स्वतंत्र विभाग कार्यरत असून, २५ लाखांपर्यंतच्या प्रशासकीय मंजुरीचे अधिकार गटविकास अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत मजुरांकडून केले जाणारे काम अकुशल, तर यंत्र सामग्रीने केले जाणारे काम कुशल काम म्हणून गणले जाते. या कामांचे प्रमाण ६०:४० असे ठेवणे बंधनकारक आहे. योजनेतून वैयक्तिक तसेच सार्वजनिक लाभाच्या कामांसाठी निधी उपलब्ध केला जातो.

# संत झुलेलाल यांचे बॅनर फाडल्यावर दोन गटात वाद : रामपुरी कॅम्प येथील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

संत झुलेलाल जयंतीनिमीत्त रॅलीमधील काही युवकांनी संत झुलेलाल महाराज, गुरु साई ओमीराम, गुरु साई लालदास यांचे बॅनर फाडल्यावरून दोन गटात चांगलाच वाद झाला. परंतु पोलिसांनी वेळीच मध्यस्ती केल्याने वाद मिटला. पोलिसांनी बॅनर फाडण्याचा ठपका ठेवत सुरेश गंगवाणी आणि डेटाराम हरवाणी (दोन्ही रा. रामपुरी कॅम्प) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

रामपुरी कॅम्पमध्ये ३० मार्चला संत झुलेलाल महाराज जयंतीनिमीत्त साई झुलेलाल वेलफेअर फाउंडेशनतर्फे रॅली काढण्यात आली होती. रामपुरी कॅम्प परिसरात रॅली फिरल्यानंतर मिट्टूच्या चक्कीजवळून रॅली जात असताना काही युवकांनी चक्कीसमोर लागलेले संत झुलेलाल महाराज आणि गुरु ओमीराम आणि साई लालदास यांचे बॅनर फाडले आणि येथे नॉन सिंधी राहतात, असे म्हणून शिवीगाळ केली. त्यावरून दोन्ही गटात वाद झाला. पोलिसासंनी मध्यस्ती करून दोन्ही गटातील युवकांची समजुत काढली तसेच विक्की करमचंद खत्री (रा. रामपुरी कॅम्प) यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला.

# अदानीच्या अंबुजा सिमेंट कारखान्याला शेतकऱ्यांचा प्रचंड विरोध

## प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या जनसुनावणी दरम्यान नागरिक आक्रमक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२चांदुर रेल्वे**


तालुक्यातील मौजा मालखेड येथे सुरु होणाऱ्या अंबुजा कॉंक्रीट नॉर्थ प्रा.लि. सिमेंट कारखान्याला सुरु होण्याआधीच स्थानिक नागरिकांनी कडाडून विरोध केला असून जनसुनावणी दरम्यान नागरिक चांगलेच आक्रमक झाले होते. त्यामुळे अधिकाऱ्यांसह कंपनीच्या अधिकाऱ्यांना काही तासातच जनसुनावणीचा कार्यक्रम गुंडाळावा लागला.

अमरावती लगतच्या मालखेड येथील १०० एकर जमीनीवर ६ एमएमटीपीए (२३ एमएमटीपीए) चा सिमेंट उत्पादन क्षमतेसह स्टैंड अलोन ग्राइंडिंग युनिट प्रस्तावित ग्रीनफिल्ड प्रकल्प सुरु होणार आहे. परंतु प्रकल्प सुरु होण्याआधी संबंधित सर्व सरकारी अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी गुप्त पध्दतीने प्रदूषण नियंत्रण मंडळ उपप्रादेशिक कार्यालयामार्फत जनसुनावणीचा कार्यक्रम आयोजित केला होता आणि कार्यक्रमानंतर संबंधित गावातील नागरिकांकरिता भोजनाचा सुध्दा कार्यक्रम होता.

जनसुनावणीला निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, चांदुर रेल्वे तहसीलदार पूजा माटोडे यांच्यासह महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच चांदूर रेल्वे तालुक्यातील मालखेड, धानोरा, दहिगाव, लालखेड, काठेवाडी हेटी, अमरावती तालुक्यातील उदखेड, कस्तुरा, मोगरा, पार्डी, वडगाव जिरे, नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील म्हसाळा, एरंडगाव या गांवामधील नागरिकांना जनसुनावणीला बोलविले होते. परंतु प्रत्यक्षात मात्र मोजक्याच गावातील नागरिकांची उपस्थिती होती. यापैकी उपस्थित गावकऱ्यांनी या सिमेंट कारखान्यापासून होणारे वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, जल प्रदूषण, मृदा प्रदूषणबाबत प्रश्न उपस्थित केले. तसेच सिमेंट कारखान्यालगत असणाऱ्या शेतीची उत्पादन क्षमता घटून शेतकरीहवालदिल होतील तसेच कारखान्यास लागणारे प्रचंड पाणी कुठून आणणार या प्रश्नावर कंपनीच्या अधिकाऱ्यांनी नियमानुसार व कंपनीच्या कायद्यानुसार व्यवस्था केली जाईल असे थातूर मातुर उत्तर देऊन नागरिकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. आधीच पाण्याच्या टंचाईचा सामना करणारे ही गावे आहेत. आणि कंपनीला लागणारे पाणी कोणत्या गावाच्या वाट्याचे घेणार हा मोठा प्रश्न याठिकाणी स्थानिक गावकऱ्यांनी उपस्थित केला. परंतु कंपनीच्या अधिकाऱ्यांनी केवळ टोलवाटोलवीची उत्तरे देत वेळ मारून नेली. तसेच उपस्थित नागरिकांना केवळ कंपनीच्या सीएसआर फंडमधून गावाचा विकास कसा होईल याबाबत आश्वासित केले. सोबतच कंपनी अद्यावत मशिनरीचा उपयोग करत असल्याने प्रदूषण होणार नाही असे देखील कंपनीच्या अधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.त्यामुळे काही नागरिकांनी यावर संमिश्र प्रतिसाद देत स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी केली. यावेळी काही नागरिकांनी कारखान्याचे स्वागत केले तर काहींनी आपण कितीही विरोध केला तर अदानीच्या कारखान्याला रोखू शकणार नाही. कारखान्यात परप्रांतीयांची भरती करून स्थानिकांचे रोजगार हिरावले जातील अशी देखील भीती व्यक्त केली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी सर्वांचे प्रश्न प्रोसेडींगला लिहिण्याच्या सूचना दिल्या होत्या. पर्यायाने कंपनी पुढे काय निर्णय घेईल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. परंतु इतक्या मोठ्या जनसुनावणीच्या कार्यक्रमाला मीडियाला आमंत्रित केले नसल्याने नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले. तसेच सरकारी यंत्रनेचा वापर करून अदानी सिमेंटचा कारखान सुरु करणारच अश्याही प्रतिक्रीया काही नागरिकांनी याप्रसंगी दिल्या.

# खामगाव -शेगाव मार्गावरील अपघात

## मृतांची संख्या सात? पाच जणांची ओळख पटली



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२बुलढाणा**

खामगाव -शेगाव मार्गावरील ब्रह्मांडनायक लॉन्स समोर बुधवारी, २ एप्रिलला झालेल्या अपघातातील पाच मृत आणि जखमीची ओळख पटली आहे. यात बुलढाणा जिल्ह्यातील एकाचा समावेश आहे. एसटी बस, ट्रॅव्हल्स व बोलेरो एकमेकांना धडकले. बोलेरो ( एम एच २८-३३१४ ही शेगाव वरून खामगाव कडे येत असताना , पुणे इथून परतवाडाकडे जाणारी एसटी बसला(क्रमांक एम एच १४ - २३४४) बोलेरो ने धडक दिली, त्यानंतर उभ्या असलेल्या एसटी बसला नाशिक येथून अमरावती येथे जाणारी इंद्राणी ट्रॅव्हल्स (एम एच १५ ४०४१) ला मागून धडक दिली.


सदर अपघातामध्ये बोलेरो मधील धनेश्वर मरावी राहणार मध्य प्रदेश, कृष्णकुमार मोहन सिंह सरोते वय २० वर्ष, शिवपाल, शिवाजी समाधान मुंडे वय ५५ वर्ष राहणार एसबीआय कॉलनी शेगाव व इंद्राणी ट्रॅव्हल्स मधील मेहरुनिसा शेख हबीब वय ४५ वर्ष राहणार धुळे मालेगाव असे चार पुरुष व एक महिला ठार झाले.

जखमीची नावे पुढीलप्रमाणे आहे. शिव धनसिह धुर्वे वय ४७ वर्ष राहणार मध्य प्रदेश कोमल गणेश गंधारे वय ५९ वर्ष राहणार अहमदनगर , वांगे प्रतीक्षा मुकुंदराव वांगे वय २६वर्ष रा. ब्राह्मणवाडा थळी तालुका चांदुर बाजार, अमरावती, सत्यपाल गुलाबराव गवई वय ४० वर्ष रा. लावखेड तालुका पातुर जिल्हा अकोला, सुमन सुखदेवराव भोंडे वय ७० वर्ष रा. अंजनगाव सुर्जी जिल्हा अमरावती,सुखदेव अमृत भोंडे वय ८१ वर्ष रा. अंजनगाव सुर्जी, दत्ता रामधन मोरखडे वय ४५ वर्ष रा. हिवरखेड रुपराव तालुका तेल्हारा , बापूराव रामकृष्ण सवाने वय ८० वर्ष रा. वझर मेग तालुका निफाड जिल्हा नाशिक, साजिया परवीन शेख हबीब वय १० वर्ष रा. धुळे मालेगाव,शेख हबीब अब्दुल रजाक वय ५० वर्ष रा. धुळे मालेगाव, रंजीत वानखेडे वय ४० वर्ष रा.मूर्तिजापूर, धनराज नागोराव उगले वय ३७वर्ष रा. बेलोरा विमानतळ अमरावती,आशिष सुखदेवराव नवले वय ४० वर्ष रा. अमरावती, प्रल्हाद शिवरामजी आवंडकर वय ७५ वर्ष रा. अंजनगाव सुर्जी अमरावती, वरद चित्रांगण रेवंदले वय ६ वर्ष रा. कुणाला फुरसुंगी बाग पुणे,वंदना देवानंद पांडवकर वय ५१ वर्ष रा. अंजनगाव सुर्जी, पुरुषोत्तम नारायण शिनकर वय ७२ वर्ष रा. करजगाव तालुका चांदुर बाजार, शालिनी पुरुषोत्तम शिनकर वय ६५ वर्ष रा. करजगाव तालुका चांदूरबाजार.

# सरकारी कर्मचाऱ्यांना समाज माध्यमांवर सरकारविरोधी पोस्ट करण्यावर निर्बंध?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती**

राज्यातील सरकारी अधिकारी आणि कर्मचारी समाजमाध्यमावर मोठ्या प्रमाणावर सक्रिय आहेत. समाज माध्यमावरील समुहात ते अनेकदा सरकारविरोधी भूमिका मांडतात. त्यांचे संदेश अनेकदा समाजहिताच्या विरोधात असतात. त्यामुळे सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या समाजमाध्यमातील सक्रियतेवर निर्बंध आणण्याची गरज आहे. तीन महिन्यांत त्या बाबतची नियमावली जाहीर केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या महिन्यात विधान परिषदेत दिली होती. त्यावर आता प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.




अर्थसंकल्पीय अधिवेशनात दोन मुद्यांवर चर्चा होऊन सरकारचे धोरण स्पष्ट करण्यात आले आहे. यात जन सुरक्षा अधिनियम-२०२४ बाबत शासन विरोधी संघटनात्मक सहभाग अथवा कृती तसेच बेकायदेशीर संघटना व त्या संघटनेतील सहभाग याबाबत दोषींना कडक शिक्षा करण्याची तरतूद प्रस्तावित अधिनियमात आहे.या अधिनियमाच्या अधिकार क्षेत्रात शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटनांचा अंतर्भाव येतो किंवा कसे याची स्पष्टता नाही. याबाबत राज्यात कर्मचारी-शिक्षकांमध्ये भय निर्माण झाले आहे. त्यामुळे या संदर्भात वस्तुस्थिती प्रत्येक सरकारी अधिकारी, कर्मचारी, शिक्षकांना अवगत करावी, अशी मागणी प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे, राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनात केली आहे.महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक नियम) १९७९ तसेच जिल्हा परिषद कर्मचारी (वर्तणूक) नियम १९६७ नुसार कर्मचारी, शिक्षकांच्या संबंधाने व्यक्त होण्याच्या बाबतीत आवश्यक नियम असून त्याचे काटेकोर पालन केले जाते. शासन, प्रशासनाच्या धोरणामुळे अनेकदा सेवा विषयक बाबी प्रभावित होतात. अनेक निर्णयामुळे अन्याय, भेदभाव होतो.दफ्तर दिरंगाईमुळे त्रास होतो. पाठपुरावा करूनही दुर्लक्ष होते. अशा परिस्थितीत सनदशीर मार्गाने आंदोलन करणे, संघटना पदाधिकारी म्हणून मर्यादा उल्लंघन न करता प्रसार समाज माध्यमावर व्यक्त होणे हा नियमाचा भंग होत नाही. अशा बाबींकडे शासनाने वस्तुस्थिती लक्षात घेऊन आत्मीयतेने पाहण्याची गरज आहे.वरील दोन्ही संबंधाने कोणत्याही निर्णयाप्रत येण्यापूर्वी प्रातिनिधिक कर्मचारी, शिक्षक संघटनांसह व्यापक चर्चा होणे आवश्यक आहे. याबाबत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती चर्चेसाठी निमंत्रणाच्या प्रतीक्षेत आहे. सनदशीर मार्गाने आंदोलनाचा अधिकार आणि व्यक्त होण्याचा अधिकार, स्वातंत्र्य अबाधित राहील असाच निर्णय व्हावा, अशा मागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने शासनाकडे पाठवले आहे, अशी माहिती शिक्षक समितीचे प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी दिली आहे.

# शासकीय मुद्रणालयाची जमीन विधानभवनाकडे हस्तांतरित; विस्ताराचा मार्ग मोकळा

## ९,६७० चौ. मीटर जमिनीवर उभारले जाणार नव्या इमारती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नागपूर**



नागपूरच्या विधानभवन परिसराच्या विस्ताराला अखेर मूर्त स्वरूप येण्यास सुरुवात झाली आहे. राज्य सरकारने शासकीय मुद्रणालयाची जमीन विधानभवनाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला आहे. आता येथे विधानभवनाचा विस्तार होणार आहे. मुद्रणालयालाही अन्न व नागरी पुरवठा विभागाचा एक भूखंड देण्यात येणार आहे.

राज्य सरकारच्या उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागाने यासंदर्भात शासन निर्णय जारी केला आहे. त्यानुसार, शहरातील मौजा सीताबर्डी गावातील उद्योग विभागाच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या शासकीय मुद्रणालयाच्या १६,१८२ चौरस मीटर जमिनीपैकी ९,६७० चौरस मीटर जमीन विधानमंडळ सचिवालयाला कार्यालयीन कामासाठी हस्तांतरित होणार आहे. उद्योग विभागाने यासाठी महसूल विभागाला ना-हरकत प्रमाणपत्रही दिले आहे. याजवळच अन्न व नागरी पुरवठा विभागाची १७,६३० चौरस मीटर जमीन आहे. यापैकी ९,६६० चौरस मीटर जमिनीवर पाच गोदामे आहेत. ही जमीन शासकीय मुद्रणालयाच्या ताब्यात देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या दोन्ही जमिनींच्या हस्तांतरणासाठी विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**भुयारी मार्ग किंवा पूल**

विधानभवन आणि शासकीय मुद्रणालयाच्या जागेत काही अंतर आहे. मध्ये रस्ताही आहे. त्यामुळे दोन्ही जागा जोडण्याचाही प्रश्न आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने (पीडब्ल्यूडी) येथे भुयारी मार्ग बनविण्याचा प्रस्ताव दिला आहे. पूल बनविण्याचाही विचार होऊ शकतो, असे सूत्रांचे म्हणणे आहे. याशिवाय, विधानभवनाच्या प्रवेशद्वारासमोरील इमारतही ताब्यात घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, नुकसानभरपाईच्या रकमेवरून बांधकाम व्यावसायिक आणि सरकार यांच्यात एकमत झालेले नसल्याची माहिती आहे.

**सचिवालयाची होती मागणी**

विधानमंडळ सचिवालयाने परिसराचा विस्तार करण्याची विनंती केली होती. या पार्श्वभूमीवर १६ डिसेंबर २०२४ रोजी विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीतच शासकीय मुद्रणालयाच्या ९,६७० चौरस मीटर जमिनीची मागणी करण्यात आली होती. विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समितीने जमिनीची उपलब्धता आणि मोजणी केली होती.

# दर्यापुरात तुकाराम पाऊचा शुभारंभ : कु. उ.बा. परिसरात प्याऊ चा उपक्रम २०वर्षाची परंपरा कायम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२दर्यापूर**




दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा दर्यापुर कृषी उत्पन्न बाजार समितीचे अडते व्यापारी संचालक प्रभाकर पाटील तराळ यांच्या तर्फे तुकाराम प्याऊ लावण्यात आली आहे. या प्याऊ चा शुभारंभ जिल्हा बँक माजी अध्यक्ष सुधाकर पाटील भारसाकळे यांच्या उपस्थितीत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करून गाडगे महाराज बालगृह संचालक गजानन देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन झाले. प्रभाकर पाटील कराड यांनी उपस्थीत मान्यवरांचे स्थागत केले गेल्या २० वर्षापासून 'तराळ कुंब हा उपक्रम बाजार समितीत येणाया नागरिकांच्या सुविधे करता राबवीत आहेत. तराळ कुटुंबाचा या कार्यातून आदर्श घ्यावा असे आवाहन गजानन देशमुख यांनी यावेळी केले कार्यक्रमाला तालुका कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष अध्यक्ष सुधाकरभाऊ भारसाकळे, अमोल तराळ, नंदुभाऊ गावंडे, किशोरभाऊ गिते, अमितभाऊ तराळ, जय तराळ, यादी उपस्थित होते.

# आदिवास्याच्या उत्थानासाठीकेंद्राकडून २४ हजार कोटींच्या निधीची तरतूदप्रधानमंत्री जनजाती न्याय अभियानातून विकासाला चालना : खा. अनिल बोंडेंच्या लक्षवेधीवर मंत्र्यांचे उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

देशभरातील विविध प्रकारच्या ७५ समूहांमध्ये असलेल्या आदिवासींच्या सर्वकष विकासासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून जनजाती आदिवासी न्याय महाअभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानाची देशभरात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठीकेंद्र व राज्य सरकारकडून २४,१०४ कोटी रुपयांच्या भरघोस निधीची तरतूद करण्यात आल्याची माहिती केंद्रीय आदिवासी कल्याण मंत्रालयाचे मंत्री जोएल ओराम यांनी राज्यसभेत दिली. राज्यसभा सदस्य डॉ.अनिल बोंडे यांनी आदिवासी समाजाच्या उत्थानासाठी सरकारकडून कुठल्या उपायोजना सुरू आहेत, त्यासाठी निधीची कशा पद्धतीने तरतूद करण्यात आली आहे, या संदर्भातील लक्षवेधी उपस्थित केली होती. या प्रश्नाला उत्तर देताना आदिवासी विकास मंत्री जोएल ओराम यांनी सांगितले की १५ नोव्हेंबर २०२३ रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी १८ राज्य व एक केंद्रशासित प्रदेशात राहणाऱ्या ७५ वेगवेगळ्या प्रकारच्या आदिवासी समुदायाच्या उत्थानासाठी सामाजिक, आर्थिक, विकासासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून आदिवासी न्याय महाअभियान पीएम जनमन अभियानाचा शुभारंभ करण्यात आला आहे. ११ वेगवेगळ्या प्रकारच्या उपाययोजना या माध्यमातून आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राबविण्यात येत आहेत. या योजनेचे एकूण बजेट २४,१०४ कोटी रुपये असल्याची माहितीही त्यांनी सभागृहाला दिली. केंद्र सरकारकडून त्यासाठी पंधरा हजार ३३६ कोटी रुपये तर राज्य सरकारकडून ८७६८ कोटी रुपये निधी देण्यात आला आहे. देशात या अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू आहे. त्यासाठी विविध प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन देखील करण्यात आलं होतं. या अभियानाची प्रगती तपासण्यासाठी निरंतरपणे जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून आढावा घेऊन अहवाल देखील मागवल्या जात असल्याचे त्यांनी म्हटलं. या संदर्भात उपप्रश्न उपस्थित करताना डॉ.अनिल बोंडे यांनी ओराम यांना विचारलं की मेळघाटातील आदिवासी बांधव, गडचिरोली, पालघर, ठाणे या क्षेत्रात आदिवासींच्या विकासासाठी सरकारकडून कुठली पावलं उचलली जात आहेत त्यावर बोलताना मंत्री ओराम म्हणाले की, पीएम जनमन योजनेची व्याप्ती वाढवण्यात आली आहे. ७५ वेगवेगळ्या समुदायांमध्ये विभागलेल्या २१७ ब्लॉग मध्ये असलेल्या आदिवासींचा पूर्णपणे विकास व्हावा यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी प्रयत्नशील आहेत. आदिवासी ज्या गावात वास्तव्याला आहेत तेथील रस्ते, पाणी, वीज, शिक्षणाच्या सुविधा विकसित करण्याचा प्रयत्न मंत्रालयाकडून केला जात आहे. वीज पोचवण्यासाठी जिथे अडचणी येत असेल त्याठिकाणी सौर ऊर्जेच्या माध्यमातून वीज पोहचली गेली पाहिजे. या सोबतच याकरिता ९ मंत्रालयांची देखील मदत घेण्यात आली आहे. आदिवासींना रोजगार मिळावा त्यांची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल झाली पाहिजे. महिला सक्षमीकरण व्हायला पाहिजे या संदर्भातील माहिती देखील अनिल बोंडे यांनी ओराम यांना विचारली. त्यावर त्यांनी सांगितले की आदिवासी घटकातील महिलांना सक्षम करण्यासाठी स्वयंरोजगारासाठी पुढे येणाऱ्या महिला गटांना सरकारकडून रोजगार उभारण्यासाठी अल्प दरात कर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. स्थानिक स्तरावर तयार होणाऱ्या आदिवासींच्या उत्पादनाला वनधन केंद्राच्या माध्यमातून बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचाही प्रयत्न सुरू आहेत. तसेच देशातील विविध प्रकारच्या कार्पोरेट कंपन्यांमध्ये आदिवासींचे उत्पादन पाठवण्यासाठी देखील सरकार प्रयत्न करणार असल्याचे मंत्री जोएल ओराम यांनी स्पष्ट केले.

